## रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ८८/२०१७ मधील निशाणी क्रमांक ०५ वर आदेश

**०१.** वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

**०२.** वादी हे आपसात एकमेकाचे सख्खे भाऊ–बहिण आहेत. वादीचे वडील शंकर भिवा पाटील हे होते. ते २० वर्षापूर्वी मयत झाले. मौजे लोळाणे येथील गट नंबर १९५ पूर्वीचा सव्हे नंबर ५७/४ ही जमीन वादीचे वडील शंकर भिवा पाटील यांच्याने ७/१२ पत्रकी मालक व वहिवाटदार म्हणून नोंद होती.

**०३.** वादीचे वडील दावा मिळकतीमध्ये पूर्वीपासून कुळ होते. त्यांनी ही जमीन १९५३ साली विठठल केतकर, मधुकर केतकर व वसंत केतकर यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केली आहे. वादीचे वडीलानंतर दावा मिळकतीमध्ये वादी हे मालक व वहिवाटदार आहेत.

**०४.** दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्कसंबंध नाही. एकत्रीकरणचेवेळी गट नंबर १९५ ला बेकायदेशिरपणे प्रतिवादीच्या नावाची नोंद झाल्याचे वादींना नुकतेच समजून आले. दिनांक २७/०७/२०१७ रोजी प्रतिवादींनी दावा मिळकतीत येवून वादींना हरकत अडथळा केला. म्हणून त्यांनी प्रतिवादींचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

**०५.** प्रतिवादींनी याकामी आपले म्हणणे नि.क्रं.११ वर सादर केले आहे. त्यांनी कथन केले की दावा मिळकतीचा पूर्वीचा सव्हे नंबर ५७/४ कधीही नव्हता. एकत्रीकरणापूर्वी गट नंबर १९५ चा जुना सव्हे नंबर ५७/१० असा होता. सव्हे नंबर ५७/१० हा पूर्वीपासून प्रतिवादी व त्यांचे पूर्वहक्कदार यांच्या मालकी वहिवाटीचा होता व गट नंबर १९५ आजही प्रतिवादींच्या मालकी वहिवाटीचा आहे. त्याच्याशी वादीचा कोणताही संबंध नाही.

०६. त्यांनी पुढे कथन केले की वादींच्या म्हणण्याप्रमाणे जुना सव्हे नंबर ५७/४ याचा नविन गट नंबर १९५ असेल व एकत्रीकरण योजनेमध्ये त्याबाबत चुक झाली असल्यास वादीनी एकत्रीकरण सक्षम अधिकारी यांच्याकडे दाद मागणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी विनंती केली की वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

०७. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता माझ्या विचारार्थी खालील मुददे निघतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे

| अ.क्रं. | विचाराथी निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १... | वादींनी प्रथमदर्शनी प्रकरण शाबीत केले आहे काय ? | ... होय .. |
| २... | तुर्तातुर्त मनाई आदेश न मिळाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... होय .. |
| ३ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | ... होय .. |
| ४ | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणेमिमांसा

**मुददे क्रमांक १ ते ४ करीता –**

०८. प्रतिवादींच्या विधीज्ञांनी नि.क्रं.२०/१ वर गट नंबर १९५ मौजे लोळाणे याचा नकाशा हजर केला आहे. तसेच यादी क्रं.२३ वर गट नंबर १९८, १८६, १९६ चे ७/१२ उतारे हजर केले आहेत. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की नकाशाप्रमाणे लगत असलेल्या गट नंबर व त्याच गट नंबरचे ७/१२ ला मालक व वादीने दाव्यामध्ये दिलेल्या दावा मिळकतीच्या चतुःसिमामधील मालक हे जुळत नाहीत. त्यामुळे चतुःसिमा चुकीच्या आहेत.

०९. वादींनी दाव्यामध्ये दावा मिळकतीचा गट नंबर, जुना सव्हे नंबर हा देखील कथन केला आहे. दिवाणी व्यवहार संहितेचा आदेश ७ नियम ३ अन्वये दावामिळकतीचे वर्णन नंबर देवून

किंवा चतुःसिमा देवून करता येते. प्रतिवादींनी या कामी गट नंबर १९५ साठी कायम मनाई मागत प्रतिदावा केला आहे. त्यामुळे वादींच्या दाव्यामधील चतुःसिमेतील नाव चुकले असले तरीही दाव्यावर त्याचा विपरीत परिणाम होत नाही.

**१०.** प्रतिवादींनी याकामी नि.क्रं.२२ ला फेरफार क्रमांक ४५३ मौजे लोळाणे हजर केला केला. यावरुन असे दिसते की सव्हे नंबर ५७ चे प्रथम एकूण ९ भाग पडले. वादीने या कामी नि.क्रं.२२ सोबत मौजे लोळाणे येथील सव्हे नंबर ५७ चे पोटहिस्से १ ते ९ यांचा हिस्सा फार्म हजर केला आहे. त्यानुसार सव्हे नंबर ५७/४ हा वादींच्या नावे दिसून येतो. तसेच सव्हे नंबर ५७/४ मौजे लोळाणे याचेपुढे १ ते १५ हिस्से पडले त्यामध्येदेखील ५७/१० हा हिस्सा वादीचे पुर्वज शंकर भिवा पाटील यांच्या नावे दिसून येतो.

**११.** वादींनी हजर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की मौजे लोळाणे येथील सव्हे नंबर ५७/४ चा पुढे सव्हे नंबर ५७/१० झाला व त्याच्याच पुढे गट नंबर १९५ झाला. सव्हे नंबर ५७/४ व ५७/१० ला वादींचे पुर्वज शंकर भिवा पाटील यांचे नाव नमूद आहे. प्रतिवादींनी हजर केलेल्या सव्हे नंबर ५७/१० च्या एकत्रीकरण उता–यावरुन एकत्रीकरणावेळी सव्हे नंबर ५७/१० ला प्रतिवादींच्या पुर्वजांचे नाव लागल्याचे दिसून येते. परंतु मुळ सव्हे नंबर ५७/४ चे १ ते ९ हिस्से पाहिले असता त्यामध्ये प्रतिवादींच्या पूर्वजांचे नाव आढळून येत नाही.

**१२.** प्रतिवादींनी आपल्या प्रतिदाव्याची भिस्त एकत्रीकरण योजनेवर ठेवली आहे परंतु वादी याकामी सन १९५३ सालचा नोंदणीकृत खरेदीखत हजर करुन त्यावर विसंबून आहे. या खरेदी खतातून असे दिसून येते की वादीचे पूर्वज शंकर भिवा पाटील यांनी विठठल केतकर, वसंत केतकर व मधुकर केतकर यांच्याकडून सव्हे नंबर ५७/४ हा विकत घेतला आहे. या खरेदीखताचा अंमल फेरफार क्रमांक २१९ ने झाला असल्याचेदेखील दिसून येते. महसुलांच्या कागदपत्रांच्याऐवजी वादीने हजर केलेले नोंदणीकृत खरेदीखत वरचढ ठरते. म्हणून दावा

मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेदार असल्याचे निष्पन्न होते. याउलट प्रतिवादींचे नाव सव्हे नंबर ५७/१० ला कसे लागले हे त्यांना दाखवता आले नाही.

**१३.** वादींनी या कामी नि.क्रं.१८ ला कारखान्यात पाठवलेल्या दाव्यामधील उसाची पावती सन २०१०–१३, २०१६ अशा सर्व वर्षांची हजर केली आहे. याऊलट दावा मिळकतीतील आपला ताबा असल्यासंदर्भात कोणताही कागद प्रतिवादींना याकामी हजर करत आला नाही. प्रतिवादींच्या नावे ७/१२ आहे परंतु वादीचे खरेदीखत व कारखान्याला उस पाठविल्याच्या पावत्या याद्वारे दावा मिळकतीमध्ये ताबा वादींचा असल्याचे दिसून येते. वादींनी प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे.

**१४.** दावा मिळकती मध्ये असलेला ऊस हा वादींचा आहे व त्या पिकाचा मोबदला वादींना न मिळाल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी आपली मालकी व ताबा सिध्द करु शकले नाहीत त्यामुळे त्यांचे अपरिमित नुकसान होत नाही. दाव्याचा कल हा १९५३ च्या नोंदणीकृत खरेदीखताआधारे वादीच्या बाजूने आहे. म्हणून मी मुददे क्रमांक १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी अगर तर्फ इसमांनी वादींच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येत आहे.

**०३.** खर्चाचा आदेश दाव्यासोबत.

सही/–
(अ.अ.वाळूजकर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मलकापूर–शाहुवाडी

दिनांक –०६/०३/२०१८

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S.A.SHINDE
Name of the Court : A.A.Walujkar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi,

Date of order : 06/03/2018
Order signed by the presiding officer on : 06/03/2018
Order uploaded on : 14/01/2018